## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, हिंगणा यांचे न्यायालयात

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 639/२०२५

सरकार वि.

निशाणी क्रमांक–

## आरोपीचे प्रतिकथन

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपघात घडल्याचा दिनांक | : | 19/10/2025 |
| २. | तक्रार दाखल केल्याचा दिनांक | : | 19/10/2025 |
| ३. | फिर्यादीचे नाव व पत्ता | : | पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, नागपुर |
| ४. | आरोपीचे नाव, वय व पत्ता | : | दिनेश जगनाथ कवेकार<br>वयः–25 वर्ष, धंदाः– ड्रायव्हर,<br>राः– जामडोह यवतमाळ |
| ५. | अपराधाचे विवरण | : | दिनांक --19/10/2025--- रोजी मौजा --M.I.D.C. बोरी- तह–हिंगणा, जिल्हा–नागपुर येथे पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत तुम्ही तुमच्या ताब्यातील क्रुझर-- क्र. एम.एच.-30-AA-3820--- या वाहनाचा आरटीओचा परवाना नसतांना अतिरिक्त प्रवासी बसवुन अवैद्यरित्या वाहतुक करतांना मिळून आले व त्यायोगे तुम्ही मोटर वाहन कायद्याचे कलम ६६(१), १९२(अ) च उल्लंघन करुन शिक्षापात्र गुन्हा केला आहे. |

(६) **आरोपीची जबानी (Plea).**

प्रश्न (१) :– तुम्हाला दाखल केलेल्या प्रकरणात दाखल कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर :- होय.

प्रश्न (२) :- तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप तूम्हाला समजावून सांगीतला, तो तूम्हाला समजला काय?

उत्तर :- होय.

प्रश्न (३) :- तुम्हाला गुन्हा कबूल आहे का?

उत्तर :- होय, आम्हाला गुन्हा कबूल आहे व मी तशी पूरसीस नि.क्र.०२ वर दाखल केली आहे.

दिनेश कुंभोकार
आरोपीची सही

समक्ष

(व्ही.एच.खेडकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, हिंगणा

दिनांक:- १४/०३/२०२६

**<u>आदेश नि.क्र.१ खाली</u>**

आरोपी हा आज दिनांक १४/०३/२०२६ रोजी न्यायालयात हजर झाला आहे. आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुल करत असल्याबाबत न्यायालयात सांगीतले. आरोपीविरुद्ध मोटर वाहन कायद्याचे कलम ६६(१), १९२(अ) अन्वये गुन्हा दाखल आहे. आरोपीने गुन्हा कबुल केला आहे. त्याला कायद्यामध्ये असलेल्या शिक्षेची तरतुद समजावुन सांगीतली. तरीही आरोपीने गुन्हा कबुल केला आहे.

आरोपीचे, त्यांच्या वकीलांचे व सरकारी वकीलांचे म्हणणे ऐकले. आरोपीने युक्तीवाद केला की, ते सराईत गुन्हेगार नाही. त्याच्याकडुन अनावधानाने चुक झाली आहे व पुन्हा असा गुन्हा करणार नाही. हा त्यांचा प्रथम गुन्हा आहे आणि सदर गुन्हयासाठी त्याला पश्चाताप होत आहे, त्यामुळे त्याला कमीत कमी शिक्षा दयावी अशी विनंती केली आहे. सबब, गुन्हयाचे स्वरूप पाहता व आरोपीने स्वतःहुन प्रामाणिकपणे गुन्हयाची दिलेली कबुली पाहता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

AIScanner

**-::: आ दे श ::-**

१) आरोपीस यास मोटर वाहन कायद्या कलम ६६(१), १९२(अ) खालील गुन्हयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये दोषी ठरविण्यात येत आहे.

२) आरोपीला मोटर वाहन कायद्याचे कलम ६६(१), १९२(अ) खालील गुन्हयात रुपये २०००/- (अक्षरी दोन हजार फक्त) दंड द्रव्याची शिक्षा सुनावण्यात येत आहे व सदरची दंड द्रव्याची रक्कम न भरल्यास पाच दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा भोगुन दयावी लागेल.

**सदरचा आदेश खूल्या न्यायालयात जाहीर.**

दिनांकः-१४/०३/२०२६

(व्ही. एच. खेडकर,)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, हिंगणा

Find Rs. 2000/-
Paid vide receipt
No. 455/26 dt.
14/03/26

A.S.
14/03/26